महानगरपालिका, जिल्हापरिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका-२०१७
महत्वाचे राजकीय पुढारी (स्टार कॅम्पेनर) यांच्या संख्येबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१७/प्र.क्र. १७ /का.५
दिनांक : २१ जानेवारी, २०१७

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ / मनपा-२०११/प्र.क्र.१७/ का.५, दि. ८ नोव्हेंबर, २०११ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता मान्यताप्राप्त राजकीय पक्ष व इतर पक्ष यांनी जाहीर करावयाच्या महत्वाच्या पुढाऱ्यांची ( Star Campaigners) संख्या विहित करण्यात आलेली आहे.

३. आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये आगामी निवडणुका फार मोठ्या प्रमाणावर असल्याने स्टार प्रचारकांच्या संख्येमध्ये वाढ करण्याची विनंती पुढे आली होती आणि त्यास अनुसरुन नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांकरिता दि.२५ ऑक्टोबर, २०१६ च्या पत्रान्वये वाढ करण्यात आली.

४. आणि ज्याअर्थी; राज्यातील २५ जिल्हा परिषदा आणि २८३ पंचायत समित्यांसाठी दिनांक १६ आणि २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होत आहे. तर १० महानगरपालिकांसाठी दि. २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होत असून या निवडणुकांकरिता महत्वाच्या राजकीय व्यक्तींची / प्रचारकांची (Star Campaigners) संख्या वाढविणे आवश्यक आहे.

५. त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या पक्षांनी फेब्रुवारी, २०१७ मध्ये होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हापरिषद / पंचायत समिती निवडणुकांकरिता जाहीर करावयाच्या महत्वाच्या राजकीय व्यक्तींची / प्रचारकांची (Star Campaigners) संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | पक्ष | १० महानगरपालिका / २५ जिल्हापरिषद / २८३ पंचायत समिती निवडणुकांकरिता स्टार प्रचारकांची संख्या |
|---|---|---|
| १ | भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त (राष्ट्रीय पक्ष, राज्यस्तरीय पक्ष व इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष) असलेले राज्य निवडणूक आयोगाच्या यादीतील पक्ष (एकूण १५) | कमाल ४० महत्वाच्या राजकीय व्यक्ती / स्टार प्रचारक (Star Campaigners). |
| २ | राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले इतर पक्ष (एकूण १९०) | कमाल २० महत्वाच्या राजकीय व्यक्ती / स्टार प्रचारक (Star Campaigners) |

६. राजकीय पक्षांनी ही यादी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या प्रथम दिवसापासून ७ दिवसांच्या आत संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच त्याची प्रत आयोगास माहितीसाठी सादर करावी. मात्र संपूर्ण राज्यातील यथास्थिती सर्व महानगरपालिका, सर्व जिल्हापरिषदा व सर्व पंचायत समित्या निवडणुकांकरिता ही संख्या वर विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व महानगरपालिका आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
४) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
५) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
६) निवड नस्ती.

D:\MAHALE १३.१.१७\Corporation\जनमत चाचणी.docx/महाले